कोळप्याने व तिसरी कोळपणी ८ व्या आठवड्यात दातेरी कोळप्याने करावी.

पाणी व्यवस्थापन

करडई हे पीक अवर्षण प्रतिकारक असल्यामुळे या पिकाच्या वाढीस कमी पाणी लागते. मध्यम ते भारी जमिनीत पुरेसा ओलावा असल्यास करडईच्या पिकास पेरणीनंतर पाणी देण्याची गरज भासत नाही.कालांतराने ओलावा कमी झाला आणि पाणी देण्याची सोय असेल तर पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी जमिनीस तडे जाण्यापूर्वी एक संरक्षित पाणी देणे अधिक चांगले. दुसरे पाणी पीक फुलोऱ्यात येताना ५५ ते ६० दिवसांनी द्यावे. पिकास पाण्याचा जास्त ताण पडू देऊ नये. तसेच भेगा पडल्या नंतर पाणी दिले असता पाणी जास्त प्रमाणात जमिनीत मुरते. जास्त पाण्यामुळे पीक मोठ्या प्रमाणात मर रोगास बळी पडते. म्हणून करडई पिकास हलके पाणी द्यावे.

पीक संरक्षण

मावा कीड

करडईवरील माव्याच्या प्रभावी नियंत्रणासाठी ७५ एस.पी. ॲसिफेट १६ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात पहिली फवारणी पेरणीनंतर ४० ते ५५ दिवसांनी आणि दुसरी फवारणी ५५ ते ६० दिवसांनी करावी.

पानावरील अल्टरनेरिया करपा

करडईच्या पानावरील अल्टरनेरिया करपा रोगाच्या प्रभावी आणि किफायतशीर नियंत्रणासाठी रोगाचा प्रादुर्भाव दिसू लागताच कार्बेन्डाझिम (१२%) + मेन्कोझेब (६३%) किंवा इप्रोडीऑन (२५%) + कार्बेन्डाझिम (२५%) या संयुक्त बुरशीनाशकांच्या २ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने गरजेनुसार एक ते दोन फवारण्या कराव्यात.

काढणी

करडई हे पीक १३० ते १३५ दिवसांत काढणीस तयार होते. या पिकाची बोंडे व पाने पिवळी पडल्यानंतर काढणी करावी. कापणी सकाळच्या वेळेस करावी, सकाळच्या वेळेस हवेत आद्रता जास्त असल्यामुळे दाणे गळत नाहीत व हाताला काटे टोचत नाहीत. एकात्मिक काढणी व मळणी यंत्र हे पिकाच्या काढण्यासाठी उपयुक्त आहे या यंत्राने कमी वेळेत व कमी खर्चात करडईची काढणी करता येते.या मशीन मधून स्वच्छ धान्य बाहेर येते आणि कोणतीही प्रक्रिया न करता माल विक्रीसाठी नेता येतो. करडई पिकास काटे असल्यामुळे काढणी मजुरा द्वारे केल्यास खर्चिक होते.

उत्पादन

मध्यम जमिनीत वरील सुधारित तंत्राचा अवलंब करून लागवड केल्यास प्रति हेक्टरी १२ ते १४ क्विंटल आणि खोल जमिनीत १४ ते १६ क्विंटल उत्पादन मिळते. बागायती पिकापासून २० ते २५ क्विंटल प्रति हेक्टरी उत्पादन मिळते.

करडई पिकावरील मावा कीड



करडई पिकावरील करपा रोग

✻ लेखक ✻

डॉ.शरद गोविंदराव जाधव
विषय विशेषज्ञ (कृषि विद्या) कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ

श्री. दिनेश नंदकुमार क्षीरसागर
विषय विशेषज्ञ (अन्नशास्त्र व तंत्रज्ञान) कृषि विज्ञान केंद्र मोहोळ जि. सोलापूर

प्रा. पंकज नागराज मडावी
विषय विशेषज्ञ (पीक संरक्षण) कृषि विज्ञान केंद्र मोहोळ जि. सोलापूर

✻ संपादक ✻

डॉ. शरद गडाख
संचालक, विस्तार शिक्षण
व संचालक संशोधन, म.फु.कृ.वि. राहुरी

✻ सहसंपादक ✻

डॉ. पंडित खर्डे
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र, मफुकृवि,राहुरी

डॉ. सचिन सदाफळ
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र,मफुकृवि,राहुरी

✻ प्रकाशक ✻

डॉ. तानाजी वळकुंडे
प्रभारी कार्यक्रम समन्वयक,
कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ

✻ संपर्क : कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ,जि. सोलापूर. फोन : ०२१८९-२३३००१

email : kvkmohol@yahoo.com, www.mpkvkvkmohol.org

मफुकृवि/विस्तार/प्रकाशन क्र. २३५९/२०२०

करडई लागवडीचे सुधारित तंत्रज्ञान

ICAR

महात्मा फुले कृषि विद्यापीठ

कृषि विज्ञान केंद्र

मोहोळ, जि. सोलापूर. फोन : ०२१८९-२३३००१

Email : kvkmohol@yahoo.com website " www.mpkvkvkmohol.org

करडई लागवडीचे सुधारित तंत्रज्ञान

करडई हे रब्बी हंगामात घेतल्या जाणाऱ्या पिकांमध्ये महत्त्वाचे तेलबिया पीक आहे. तेलबिया पिकामध्ये करडईस विशेष महत्त्व आहे ते म्हणजे त्यातील तेलात संतृप्त स्निग्ध आम्लाचे प्रमाण इतर तेलबिया पिकांच्या तुलनेत बरेच कमी आहे. तेलाच्या गुणवत्तेमुळे करडईचे तेल हृदयरोग टाळण्यासाठी आरोग्यदायी आहे. त्याचबरोबर करडई हे पीक कमी पाण्यात, कमी खर्चात जास्त उत्पादन देणारे आणि अवर्षणाचा ताण सहन करणारे पीक आहे. करडईची सोटमुळे जमिनीत खोलवर जात असल्यामुळे खोलीतील ओलावा व अन्नद्रव्ये शोषून घेतली जातात. त्यामुळे अवर्षण प्रवण परिस्थितीत कमी पावसाच्या वेळेस या पिकापासून हमखास उत्पादन मिळते.

जमीन

करडई पिकाच्या लागवडीस मध्यम ते भारी जमिनीची निवड करावी. ४५ सें.मी. पेक्षा जास्त खोल जमिनीत पीक चांगले येते. त्याचप्रमाणे जमीन पाण्याचा चांगला निचरा होणारी असावी. पाणी साठवून राहिल्यास करडईच्या पिकास अपाय होतो. थोड्याफार चोपन जमिनीतही हे पीक येऊ शकते.

पूर्वमशागत

भारी जमिनीत तीन वर्षांतून एकदा खोल नांगरट करावी व हेक्टरी ५ टन शेणखत टाकावे. दोन ते तीन कुळवाच्या पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. खरीप हंगामात ६ x ६ मीटर अथवा १० x १० मीटर आकाराचे सपाट वाफे किंवा सरी-वरंबे तयार करून मूलस्थानी जलसंधारण करावे.

सुधारित वाण

क्र.	सरळ वाण / संकरीत वाण	कालावधी (दिवस)	उत्पादन (क्विं./हे.)	विशेष गुणधर्म
	अ) सरळ वाण			
१.	भीमा	१३०-१३५	१३-१५	कोरडवाहू क्षेत्रास योग्य
२.	फुले - कुसुमा	१३५-१४०	१४-१६	कोरडवाहु तसेच संरक्षित पाण्याखाली योग्य
३.	एस.एस.एफ.६५८	११५-१२०	१२-१३	बिगर काटेरी, अखिल भारतीय स्तरावर लागवडीसाठी योग्य.
४.	एस.एस.एफ.७०८	११५-१२०	कोरडवाहु १३-१५ बागायती २०-२२	पश्चिम महाराष्ट्रात लागवडीसाठी योग्य कोरडवाहु तसेच बागायती
५.	फुले करडई- ७३३	१२०-१२५	१३ - १५	कोरडवाहु लागवडीसाठी
६.	फुले चंद्रभागा (एस.एस.एफ.७४८)	१३०-१४०	कोरडवाहु १३-१५ बागायती २०-२२	कोरडवाहु तसेच बागायती लागवडीसाठी
७.	एस.एस.एफ. १२-४०	१२०-१२५	कोरडवाहु १३-१५ बागायती २०-२२	तेलाचे प्रमाण अधिक, अखिल भारतीय स्तरावर कोरडवाहु तसेच बागायती लागवडीसाठी.
८.	पी.बी.एन.एस.१२	१३५-१३७	१२-१५	मराठवाडा विभागास योग्य
९.	नारी-६	१३०-१३५	१०-१२	बिन काट्याची, पाकळ्या गोळा करण्यास योग्य
१०	अकोला पिंक	१३०-१३५	१२-१५	विदर्भात लागवडीसाठी प्रसारित
	ब) संकरीत वाण			
११	नारी एन.एच.-१	१३०-१३५	१२-१४	संकरीत वाण

पेरणीची वेळ

करडईची पेरणी योग्य वेळी करणे महत्त्वाचे आहे. करडईची पेरणी सप्टेंबरच्या दुसरा पंधरवडा ते ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. बागायत करडईची पेरणी ऑक्टोबर अखेरपर्यंत करावी. लवकर पेरणी (सप्टेंबर पहिला पंधरवडा) केल्यास पिकाचे पानावरील ठिपके या बुरशीजन्य रोगामुळे फार नुकसान होते आणि पर्यायाने उत्पादनात घट येते. याउलट उशिरा पेरणी केल्यास (ऑक्टोबरचा दुसऱ्याआठवड्यानंतर)पीक वाढीची अवस्था थंडीच्या काळात आल्यामुळे माव्याचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होतो आणि उत्पादनात घट येते.

पेरणीचे अंतर

कोरडवाहू क्षेत्रात दोन ओळीतील अंतर ४५ से.मी. आणि दोन रोपातील अंतर २० से.मी. ठेवावे.

बियाणे

प्रति हेक्टरी १० ते १२ किलो बियाणे पुरेसे होते.

बीज प्रक्रिया

बियाण्यापासून तसेच जमिनीतून उद्भवणाऱ्या बुरशीजन्य रोगांच्या नियंत्रणासाठी पेरणीपूर्वी करडईच्या बियाण्यास ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची १० ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी. अझोटोबॅक्टर/अझोस्पिरिलम हे जिवाणू संवर्धक २५ ग्रॅम प्रति किलो या प्रमाणात बियाण्यास लावल्यास हवेतील नत्राचे स्थिरीकरण होऊन उत्पादनात वाढ होते.

आंतरपीक पद्धत

हरभरा + करडई (६:३) आणि जवस +करडई (४:२) या आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा.

रासायनिक खते

करडई हे पीक रासायनिक खतास चांगला प्रतिसाद देते. ५० किलो नत्र (११०किलो युरिया) आणि २५ किलो स्फुरद (१५६ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) प्रति हेक्टरी देणे आवश्यलक आहे. ही खते पेरणीच्या वेळेस दोन चाड्याच्या पाभरीने पेरून द्यावीत. बागायती करडई पिकास ६० किलो नत्र + ३० किलो स्फुरद प्रति हेक्टरी द्यावे.

आंतरमशागत

उगवणीनंतर १० ते १२ दिवसांनी या पिकाची विरळणी करणे आवश्यक आहे. विरळणी करताना चांगली जोमदार रोपे ठेवावीत. दोन रोपांमधील अंतर २० से.मी. ठेवावे. रब्बी हंगामात गरज असल्यास एखादी खुरपणी करावी. दोन ते तीन कुळवाच्या पाळ्या देणे अतिशय गरजेचे आहे. पहिली कोळपणी तिसऱ्या आठवड्यात फटीच्या कोळप्याने, दुसरी कोळपणी ५ व्या आठवड्यात अखंड पासेच्या